# प्रेस नोट ता. ०२/०२/२०२१

## बंबल/टिंडर डेटिंग साईट व्दारे युवकांना भेटुन गुंगीचे औषध देवुन लुबाडणारी "बंबल-बी" गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड च्या जाळयात

### १६ युवकांकडुन लुबाडलेले १५,२५,०००/- रु. किं चे २८९ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, बंबल डेटिंग ॲप वरुन ओळख झालेल्या एका तरुणीने दि. १०/१२/२०२० रोजी रावेत येथिल एका युवकासह त्याचे घरी येवुन त्याचे पेया मध्ये त्याचे नकळत गुंगीचे औषध मिसळुन तो झोपी जाताच त्याचे अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण-१,८५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन पोबारा केल्याने देहुरोड पोलीस ठाणे गु.र.नंबर-८५१/२०२० भा.दं.वि.कलम- ३२८,३८० प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता.

सदर तरुणीने याच प्रकारे अनेक युवकांची फसवणुक केली असल्याची दाट शक्यता असल्याने व मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश यांनी सदर प्रकरणाची गंभीर दखल घेतल्याने मा. पोलीस उप-आयुक्त सो,(गुन्हे) श्री सुधीर हिरेमठ, यांनी याबाबत गुन्हे शाखेस समांतर तपास करुन ताबडतोब सदर महिला आरोपीस निष्पन्न करुन अटक करण्याचे आदेश दिले होते.

त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/५१७ प्रविण दळे, पोना/९१६ तुषार शेटे, पोना/ ११८६ मो. गौस नदाफ, पोशि/ २१०२ प्रशांत सैद यांनी तातडीने सदर गुन्हयातील फिर्यादी यांचेशी संपर्क साधुन सदर संशयित महिला आरोपी संदर्भात माहिती घेवुन तांत्रिक तपास सुरु केला तसेच तिला शोधण्यासाठी बंबल ॲप वर स्वतःचे खोटे प्रोफाईल तयार करुन तिचे विविध प्रोफाईल शोधुन काढले व तिला तिच्याच जाळयात अडकवण्यासाठी फेंड्स रिक्वेस्ट पाठवल्या. परंतु तिने बरेच दिवस कोणत्याही प्रोफाईल वरुन प्रतिसाद दिला नाही.

त्याच दरम्यान दि. १७/०१/२०२१ रोजी वाकड पोलीस ठाणे हद्दीत सयाजी हॉटेल येथे चेन्नई वरुन पुण्यात कामानिमित्त आलेल्या एका युवकासह तसाच प्रकार घडुन त्याचे अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकुण-१,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी गेल्याने वाकड पोलीस ठाणे गु.र.नंबर-८३/२०२१ भा.दं.वि.कलम- ३२८,३७९ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर दोन्ही गुन्हे हे एकाच तरुणीने केली असण्याची दाट शक्यता असल्याने व गुन्हे शाखा युनिट-४, चे पथक सदर प्रकरणाचा पुर्वी पासुनच माग काढत असल्याने मा. पोलीस उप-आयुक्त सो, गुन्हे, श्री सुधीर हिरेमठ, यांनी सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा युनिट-४ कडे वर्ग करुन जलद तपास करण्याचे आदेश दिले.

त्याच दरम्यान गुन्हे शाखा युनिट-४ च्या पथकाने बंबल ॲप वर तयार केलेल्या विविध प्रोफाईल वरुन सदर संशयित महिलेच्या विविध प्रोफाईलवर पाठवलेल्या रिक्वेस्ट पैकी एक रिक्वेस्ट सदर तरुणीने ॲक्सेप्ट केल्याने तिच्याशी चॅट करुन तिच्या म्हणन्या नुसार भेटीची वेळ व ठिकाण ठरवण्यात आले व ती भुमकर चौक येथे भेटायला आलेवर महिला आरोपी नामे सायली देवेंद्र काळे वय-२७ वर्षे रा. टेरेस फ्लॅट, राधिका अपार्टमेंट, पोस्ट ऑफिस समोर, साधु वासवानी रोड पुणे हिला दि. २६/०१/२०२१ रोजी सापळा रचुन वाकड पोलीस ठाणे गु.र.नंबर-८३/२०२१ भा.दं.वि.कलम- ३२८,३७९ चे तपास कामी ताब्यात घेवुन अटक करण्यात आली.

सदर महिला आरोपीस अटक केल्या नंतर तिचे कडे सखोल तपास केले असता ती "टिंडर व बंबल" या ऑनलाईन डेटिंग साईटवरुन मुळचे पुण्यातील नसलेले तरुण हेरुन त्यांचेशी संपर्क साधुन त्यांना बाहेर भेटायला बोलावत असे व त्यानंतर त्यांना लॉज अथवा त्यांचे घरी नेण्यास सांगुन त्याठिकाणी गेलेवर त्यांचे नकळत त्यांचे पेयांमध्ये झोपेच्या गोळ्या टाकुन ते त्यांनी पिलेवर त्यांना गुंगी येताच त्यांचे अंगावरिल सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन चोरुन घेवुन जात असल्याचे निष्पण्ण झाले आहे.

तिने मागील ०१ वर्षात पुणे व पिंपरी चिंचवड परिसरात एकुण १६ युवकांना याच प्रकारे फसवल्याचे निष्पन्न झाले असुन तिचे कडुन १५,२५,०००/- रु. किं चे २८९ ग्रॅम सोन्याचे दागिने व मोबाईल फोन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर महिला आरोपीने चोरलेले सोन्याचे काही दागिने हे तिने रास्ता पेठ परिसरातील एका सोनाराकडे तिचे वडील हे सेवानिवृत्त कर्नल असुन सद्या त्यांचेवर रुबी हॉल येथे कॅन्सरचे उपचार चालु असल्याने पैशांची तीव्र गरज आहे असे सांगुन गहाण ठेवले होते. तसेच तिच्या आईस उच्च रक्तदाबाचा त्रास असलेने तिला डॉक्टरांनी दिलेल्या झोपेच्या गोळ्यांचा वापर सदर आरोपी गुन्हा करतेवेळी करत असे.

सदर महिला आरोपीने या प्रकारे फसवणुक केलेल्या अनेक युवकांनी तक्रार दिल्यास समाजात बदनामी होईल अथवा तरुणी पकडल्या गेल्यास ती उलटे आरोप करेल या भितीने पोलीस ठाण्यात तक्रारी दिल्या नसुन काही युवकांनी यापुर्वी केलेल्या तक्रारी नंतर दाखल खालील गुन्हे उघडकिस आले आहे.

**१) वाकड पोलीस ठाणे गु.र.नंबर-८३/२०२१ भा.दं.वि.कलम- ३२८,३७९**
**२) देहुरोड पो ठाणे, गु.र.नंबर- ८५१/२०२० भा.दं.वि.क- ३२८,३८०**
**३) चंदननगर पो ठाणे, गु.र.नंबर- २०/२०२१ भा.दं.वि.क- ३२८,३८०**
**४) चंदननगर पो ठाणे, गु.र.नंबर- २१/२०२१ भा.दं.वि.क- ३२८,३८०**

सदर तरुणी ही बंबल व टिंडर ॲप वर युवकांशी संपर्क साधल्यावर त्यांचेशी कधीही रेगुलर कॉलवर बोलत नसे, फक्त ॲपवर चॅटींग करत असे व व्हॉट्सॲपवर कॉल करत असे जेणे करुन पोलीसांनी रेगुलर कॉल रेकॉर्ड तपासले तर काहीही मिळणार नाही. तसेच गुन्हा केल्या नंतर फिर्यादीचे फोन मध्ये काही पुरावा मिळु नये म्हणुन त्यांचा मोबाईल फोन फोडुन फेकुण देत असे.

तिने लुबाडलेल्या १६ युवकांपैकी फक्त ०४ युवकांनी आज पर्यत गुन्हे दाखल केले आहेत. गुन्हे शाखा युनिट-४ मार्फत केलेल्या तपासात संपुर्ण १६ युवकांकडुन चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन जे इतर युवक सदर तरुणीच्या फसवणुकीला बळी पडले आहेत त्यांनी गुन्हे शाखा युनिट-४, डांगे चौक, पिंपरी चिंचवड येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्यांचे नावा बाबत गुप्तता राखण्यात येईल.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील गुन्हे, सहा. पोलीस आयुक्त, मा. प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, पोना/ तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, अजिनाथ ओंबासे, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, मपोशि/ स्वाती रुपनवर, वैशाली चांदगुडे आणि तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, राजेंद्र शेटे, नागेश माळी, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से**
पोलीस उप-आयुक्त
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड


महाराष्ट्र पोलीस
गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड

.